# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक - ३८७/२०२४ दिनांक १७/१०/२०२४

## प्रेस नोट

**"जेष्ठ नागरीकांना बोलण्यात गुंतवुन, हातचालाखीने फसवणुक करुन, सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या सराईत आंतरराज्यीय टोळीला ताब्यात घेवून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत करण्यात गुन्हे शाखा कक्ष -३ विरार यांना यश.!! "**

दिनांक :- १२/१०/२०२४ रोजी १६.१५ वाजण्याचे सुमारास चेतन बार ते के.एम.पी.डी कॉलेजच्या समोरुन जाणारे रोडवर, नालासोपारा पुर्व येथे फिर्यादी महिला वय - ५९ वर्षे यांना दोन अनोळखी आरोपीत यांनी बोलण्यात गुंतवुन, आरोपींनी त्यांचे कडील ५,००,०००/- रुपयांचे कागदी नोटांच्या आकाराचे बंडल फिर्यादी यांना देवुन फिर्यादी यांच्या गळयातील दिड तोळे वजनाची १,००,०००/- रुपये किंमतीची सोन्याची चैन बतावणी करुन फिर्यादी यांची फसवणुक केली. म्हणुन दोन अनोळखी आरोपींविरुध्द तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ७२२/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३१८(४), ३(५) अन्वये नोंद आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही दिवसांपासुन जेष्ठ नागरीकांना बोलण्यात गुंतवुन अशाच प्रकारे बतावणीचे गुन्हयात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष -३ विरार व्दारे सुरु करण्यात आला. दरम्यान घटनास्थळावरील उपलब्ध सि.सि.टी.व्ही. फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करुन तसेच गोपणीय बातमीवरुन आरोपीत नामे १) शंकर राय प्रभु राय वय ३७ वर्षे, रा. अंजनी वजन काटा, बोईसर, जि. पालघर. मुळ रा. जि. आग्रा, राज्य उत्तरप्रदेश. २) मंगल नाथुराम सिलावट वय ३७ वर्षे, रा. अंजनी वजन काटा, बोईसर, जि. पालघर. मुळ रा. भोपाल, राज्य मध्यप्रदेश, ३) सचिन चुनिलाल राठोड वय २२ वर्षे, रा. अंजनी वजन काटा, बोईसर, जि. पालघर. मुळ रा. जि. आग्रा, राज्य उत्तरप्रदेश. ४) राजुराय शंकर राय वय २५ वर्षे, रा. अंजनी वजन काटा, बोईसर, जि. पालघर. मुळ रा. जि. हरदोई राज्य उत्तरप्रदेश. यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांचेकडे प्राथमिक तपास केला असता त्यांचा खालील गुन्हयात सहभाग निष्पन्न होत आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | तुळींज पोलीस ठाणे | ७२२/२०२४ भारतीय न्याय संहीता ३१८(४), ३(५) प्रमाणे |
| २ | विरार पोलीस ठाणे | ७३०/२०२४ भारतीय न्याय संहीता ३१८(४), ३(५) प्रमाणे |

Scanned with CamScanner

नमुद आरोपीत यांचेकडुन सदर दोन्ही गुन्हयांतील फसवणुक झालेले सुमारे ३,००,०००/- रुपये किंमतीचे ४.५ तोळे वजनाचे सर्व सोन्याचे दागिने व इतर मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी सध्या विरार पोलीस ठाण्याचे पोलीस कोठडीमध्ये आहेत.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, सपोनि/ सोपान पाटील, पोउपनिरी/ उमेश भागवत, सफौ/ अशोक पाटील, पोहवा/मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, मनोहर तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण, सायबर सेल यांनी पार पाडली आहे.



-----ooo-----

Scanned with CamScanner